स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६** Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

---

-: कार्यालयीन आदेश :-

**विषय : प्रथम लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना अधीक्षक (वेतनश्रेणी S-१४ : ३८६००-१२२८००) पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.**

**प्रस्तावना :**

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधीक्षक (गट-ब) संवर्गातील निवडसूची वर्ष २०२१-२२ करिता, पदोन्नती कोट्यातील आरक्षित पदांसह खुल्या प्रवर्गाची सर्व रिक्त पदे, प्रथम लिपिक (गट-क) या निम्न संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीने भरण्याकरिता आवश्यक ती सर्व कार्यवाही पार पाडून, पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. त्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

-: **आदेश** :-

या संचालनालयाच्या आस्थापनेवरील प्रथम लिपिक (गट-क) (वेतनश्रेणी S-१३ : ३५४००-११२४००) या संवर्गामध्ये कार्यरत असलेल्या खालील नमूद कर्मचाऱ्यांना अधीक्षक (गट-ब) (वेतनश्रेणी S-१४ : ३८६००-१२२८००) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व प्रवर्ग | सध्याच्या पदस्थापनेचे कार्यालय | पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र मुरलीधर विसपुते (इ.मा.व.) | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे (रिक्त पदी) |
| २ | श्री. चंद्रकांत नारायण जाधव (अ.जा.) | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे (रिक्त पदी) |

०२. सदरहू कर्मचाऱ्यांना, संबंधित कार्यालय प्रमुखांनी सध्याच्या कार्यालयातून दि.२५.०५.२०२२ रोजी (मध्यान्होत्तर) कार्यमुक्त करावे व सदर कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या ठिकाणी दि.२६.०५.२०२२ रोजी (मध्यान्हपूर्व) किंवा लगोलग रुजू व्हावे.

०३. सदर पदोन्नत्या ह्या शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ मधील शासन आदेशास अनुसरुन, अधीक्षक संवर्गातील पदोन्नती कोट्यातील आरक्षित पदांसह खुल्या प्रवर्गाची सर्व रिक्त पदे ज्येष्ठतेने भरण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या

स्वरुपात करण्यात येत आहेत. त्यानुसार प्रथम लिपिक संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत नमूद कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येणारे जे मागास वर्गीय कर्मचारी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.२५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून, सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले आहेत, त्यांचा पदोन्नतीबाबत विचार करण्यात आलेला नाही.

सदरहू कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या ह्या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच, संलग्न इतर न्यायालयीन प्रकरणामध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील. परिणामी, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत शासनाचे अंतिम आदेश निर्गमित झाल्यानंतर, ज्येष्ठता बाधित होणे, ज्येष्ठतेच्या क्रमवारीत बदल होणे किंवा कनिष्ठ कर्मचाऱ्याची पदावनती होणे इत्यादी बाबी उदभवू शकतात, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

०४. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती नाकारायची आहे, त्यांनी ताबडतोब तसे आजच उलट टपाली संचालनालयास अवगत करावे. तसेच, त्यांचा नकार हा तात्पुरत्या स्वरुपातील आहे किंवा कायमस्वरुपी आहे, याबाबत देखील विनंती अर्जामध्ये स्पष्ट नमूद करणे आवश्यक राहील. जे कर्मचारी पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत किंवा पदोन्नती स्वीकारणार नाहीत, त्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती नको आहे, असे समजून त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. पदोन्नतीस नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दि.१२.०९.२०१६ मधील आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

०५. पदोन्नतीस नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांस कालबद्ध पदोन्नती / सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला / दुसरा / तिसरा लाभ मंजूर करण्यात आला असल्यास, याबाबत वेळोवळी सुधारित शासन आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

०६. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांनी, पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा, असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील नियम १३ (अ) (१) (२) (ब) (१ व २) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात यावी.

०७. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होण्यास कळविण्यात आले आहे व ते नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होतील, याबाबत संचालनालयास तातडीने अवगत करण्यात यावे.

०८. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर पदोन्नतीच्या पदावर संबंधित कर्मचाऱ्यांनी तात्काळ रूजू व्हावे, सदरहू आदेशानुसार पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून पदस्थापना बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची संबंधित कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच, राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ते गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

०९. सदर कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने पदोन्नतीने बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचाऱ्यांस, त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

१०. वरील परिच्छेद १ च्या तक्त्यातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीने पदस्थापना ह्या स्थानिक / त्यांच्या विनंतीनुसार असल्याने त्यांना पदग्रहण अवधी / बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

११. प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरदेखील प्रसिद्ध करण्यात यावेत.

**(मसूदा मा.संचालकांनी मंजूर केला असे)**

जा.क्र.आस्था/विपस-२०२१-२२/प्रलि-अधी/पदो/प्रशा-१/२६६९
दि.२५ मे, २०२२.

२५/०५/२०२२

**( वि.ल.वाघमोडे )**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :**

१. सह संचालक, नगर रचना, विभागीय कार्यालय, पुणे/कोंकण/औरंगाबाद/नाशिक/अमरावती/नागपूर.
२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
३. सर्व संबंधित कर्मचारी (विहित मार्गाने)
४. कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, टिपीव्ही-१ / २ / ३ / ४ / ५ / ६ /७, प्रशा-१/ प्रशा-१अ /प्रशा-१ ब/ प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प / अभिलेख / रेखाकला
५. मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे / मा.उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे यांचे स्वीय सहायक
६. वैयक्तिक धारिका.
७. संशोधन अधिकारी, ना.सं.घ./रा.ना.मा.प.

/- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.